Impact Factor 2.147

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-III ISSUE-X Oct. 2016

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- aiirjpramod@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

**Aayushi International Interdisciplinary Research Journal** (Refereed & Indexed Journal)
Vol - III Issue-X OCTOBER 2016 ISSN 2349-638x Impact Factor 2.147

# दलित साहित्यातील नकार

**डॉ. लहू दिगंबर वाघमारे**
मराठी विभाग,
शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव
ता. चाकूर जि. लातूर

दलित साहित्य हे दलितांच्या प्रत्यक्ष जीवनातून निर्माण झालेले असल्यामुळे ते जीवननिष्ठ आहे. या जीवनातील मानवी मूल्यांचे अवमूल्यन करणारी व्यवस्था त्यांच्या वाट्याला आलेली आहे. म्हणून या साहित्याचा भर या आदर्श मानवी मूल्यांचा समाजामध्ये प्रचार व प्रसार करण्यावर आहे. या मूल्यांची समाजमनात जागृती निर्माण करून नवी मूल्याधीष्ठित समाजरचना निर्माण करण्यासाठी हे साहित्य अविरत प्रयत्न करते.त्यासाठी या मूल्यांच्या प्राप्तीच्या व मानवी विकासाच्या आड येणाऱ्या, अज्ञान, दारिद्र्य, रूढी, परंपरा आणि सर्व प्रकारची पिळवणूक यांचा नायनाट करून पारंपरिक बंदिस्त समाजाऐवजी एक खुला समतावादी व एकसंध समाज हे साहित्य निर्माण करू इच्छिते.या साहित्याला सांस्कृतिक परिवर्तन करणे गरजेचे वाटते. कारण या देशातील संस्कृतीनेच आजवर त्यांना छळले.धर्म, रूढी, परंपरा यांचा आधार घेऊन त्यांचे सर्वांगीण दृष्टीने शोषण केले.म्हणून रूढी,परंपरा, धर्म हे या व्यवस्थेचे गुन्हेगार आहेत. हा धर्म, परंपरा आणि तिची प्रतिष्ठा हा मुख्य शत्रू असल्यामुळे शतकांच्या परंपरेला नकार देणे, हे दलित साहित्याचे एक महत्त्वाचे रूप आहे. म्हणून दलित साहित्य हे एका बाजूने विद्रोही साहित्य आहे, तर दुसऱ्या बाजूने परंपरा नाकारणारे साहित्य आहे. हजारो वर्षांपासून या देशातील अस्पृश्यांवर अमानुष अत्याचार केले जातात. परंपरेचा व धर्माचा आधार घेऊन त्याची अमानुषतेने पिळवणूक केली जाते.मानवी जीवनातील या दु:खाला साहाय्यभूत व कारणीभूत ठरलेल्या सर्व घटकांना दलित साहित्याने नाकारले आहे.प्रभाकर मांडे म्हणतात त्याप्रमाणे, "ज्यावेळी एखादी सामाजिक संस्था समाजाशी समांतर राहात नाही. तिच्यातील गतिशीलता थांबते, समाजातील परिवर्तनाशी ती संवादी राहात नाही. तिच्यासंबंधी असंतोष निर्माण होतो. ती नाकारण्याची, तिला बदलण्याची भाषा निर्माण होते. कधी-कधी समाजात निरनिराळे हितसंबंध असलेले गट निर्माण होतात. अशा वेळी साहित्यातून भावनांची किंवा विचारांची देवाणघेवाण शक्य नसते."[१] प्रभाकर मांडे म्हणतात त्याप्रमाणे वर्णाधीष्ठित समाजव्यवस्थेतील उच्चवर्णीय समाज येथील अस्पृश्यांशी समांतर राहात नव्हता. त्यामुळे हजारो वर्षांपासून दलित समाजाची गतिशिलता कुंठित झाली आहे.म्हणूनच या विषमतावादी व्यवस्थेसंबंधी दलितांच्या मनात असंतोष आहे.या असंतोषातूनच दलित साहित्यिकांमध्ये नकाराची भावना आधिक प्रगल्भ होत गेली. दलित साहित्याचा हा नकार दलित जीवनाच्या भीषण जीवनवास्तवाच्या उद्रेकातून आला आहे. हजारो वर्षांपासून अंत:करणाला डसणाऱ्या जातिभेदाच्या व अत्याचाराच्या असंख्य वेदनांतून सात्विक संताप आला आहे.या संतापातून हा नकार व्यक्त होतो.हा नकार नवसमाज रचनेसाठीच आहे. हा मानवतावादी व समतावादी नवसमाज उभा करण्यात येणाऱ्या अडसरांनाही दलित साहित्यातून नकार दिला जातो.हा नकार व्यक्त करताना नारायण सुर्वे लिहितात,

"इथल्या वस्त्यांना हुंगणारा केवळ कातळाचा काळोख
कंदील खोपटास खोवून वावरु नये, तर काय करावे?
ज्यांना जन्मभर दु:ख, दैन्य, दारिद्र्यच मिळाले असेल
त्यांनी तपशिलांसह सर्वच नाकारु नये, तर काय करावे?"[२]

या देशातील रूढी-परंपरेने ग्रासलेल्या धार्मिक, दैविक आणि पुरातन संस्कृतीने येथील दलितांच्या वाट्याला अत्यंत भयावह आणि मूल्यहीन जीवन लादले. त्यांना आजन्म दु:ख, दैन्य व दारिद्र्यच मिळाले. म्हणून हे साहित्य या संस्कृतीच्या सर्व तपशिलासह ही व्यवस्था नाकारते. या व्यवस्थेने दलितांच्या हजारो पिढ्या उद्ध्वस्त केल्या. या उद्ध्वस्ततेच्या अस्वस्थतेतून दलित साहित्यातील विद्रोह आलेला आहे. या विद्रोही मनोवृत्तीने या देशातील सबंध शोषणव्यवस्था नाकारली. म्हणूनच नकार ही संकल्पना माणसाच्या मानसिकतेशी संबंधित आहे. हा नकार एका गंभीर आणि जिवंत अशा जीवनवास्तव्याच्या आविष्कारातून आला आहे. या वर्णाधीष्ठित समाजव्यवस्थेत हिंदू धर्म, धर्मग्रंथ आणि विषमतेला खतपाणी घालणारे काही आचार-विचार दलितांवर लादले म्हणून ही परंपरावादी आचार-विचार मांडणारी व विषमता पोसणारी व्यवस्था दलित साहित्याने नाकारली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याच विचारक्रांतीतून ही नकाराची भावना दलित जनतेमध्ये व साहित्यिकांमध्ये निर्माण झाली आहे. हिंदू धर्मातील जातिभेदातून उदयास आलेल्या या नकाराचे स्वरूप व्यक्त करताना डॉ. सदा कऱ्हाडे लिहितात, "डॉ. आंबेडकरांच्या विचारप्रणालीनुसार देव, धर्म, आत्मा, परमात्मा, पुनर्जन्म तसेच पूर्वजन्म इ. कल्पनांना दलित साहित्याने नकार दिला. समाजात स्थान नसल्यामुळे आणि वर्णव्यवस्थेने बहिष्कृत ठरविल्यामुळे दलित साहित्याने ही व्यवस्थाच नाकारली. त्याप्रमाणे प्रस्थापित मराठी साहित्यात आमच्या जीवनानुभवांना उद्‌गारच नसल्यामुळे दलित साहित्याने प्रस्थापित मराठी साहित्यालाही नकार दिला."[३] डॉ. बाबासाहेबांनी अस्पृश्यांना विज्ञाननिष्ठ विचार दिला, डोळस दृष्टी दिली. त्यामुळे या देशातील अस्पृश्यांना हजारो वर्षांपासून शोषणात ठेवणारे जे संकेत आणि कल्पना आहेत त्यातील फोलपणा त्यांना जाणवला. देव, धर्म, आत्मा, परमात्मा आणि पुनर्जन्म अशा या फोल आणि खोट्या कल्पना येथील समाजजीवनात प्रेरणा व आदर्श म्हणून जगण्यासाठी पवित्र व पूजक मानल्या जात होत्या. या कल्पनांच्या पूर्तीसाठी समाजातील नियमांच्या आधिन राहून लाचारी स्वीकारण्याची परंपरा दलित साहित्यिकांच्या समोर होती. म्हणून मग या सर्व अनिष्ठ कल्पना आणि या कल्पनांनी समृद्ध व परिपूर्ण असलेल्या वाङ्‌मयातूनही दलित जीवनानुभव व या अनुभवातील दु:ख आणि वेदना यापूर्वीच्या साहित्यिकांनी व्यक्त केल्या नाहीत. भारतीय समाजजीवनात अनेक महाकवी होऊन गेले; परंतु एकाही महाकवीला दलितांची वेदना साहित्यातून व्यक्त करावी वाटली नाही असे दया पवार यांना वाटते. म्हणून ते लिहीतात -

"हे महाकवे, तुला महाकवी तरी कसे म्हणावे
हा अन्याय, अत्याचार वेशीवर टांगणारा
एक जरी श्लोक तू रचला आसतास.........
.... तर तुझे नाव काळजावर कोरून ठेवले असते"[४]

कल्पनेचे अनेक रंग भरून महाकवींनी मनोरंजन व अस्तित्वहीन अनेक विषय चित्रित केले; परंतु गावकुसाबाहेरचे भरडलेले, या वर्णव्यवस्थेने चिरडलेले दलित जीवन मात्र साहित्यातून व्यक्त झाले नाही.

आजपर्यंतच्या मराठी कवींनी आपल्या कवितेतून दलित जीवनाची वेदना व्यक्त केलीच नाही. कारण ते अदलित कवी या देशातील पारंपरिक रूढी, संस्कृती व परंपरेला शरण गेलेले असल्यामुळे पारंपरिक समाजव्यवस्थेचे ते समर्थक होते. म्हणून समाजव्यवस्थेने दलितांवर लादलेले निर्बंध त्यांना मान्य होते. येथील वर्णाधीष्ठित समाजव्यवस्थेने दलितांना वाळीत टाकले. त्यांचे पशुपातळीवरील जीवन समाजजीवनात उपेक्षित ठेवले. तसेच ते साहित्यातूनही दुर्लक्षितच ठेवले. दलितांच हे अपमानास्पद जीवन पांढरपेशी लेखकांच्या लेखनाचा विषय कधीच झाला नाही. समाजात अस्पृश्यांची एवढी घोर अवहेलना होत असताना लेखकांनी आपली लेखणी पानात, फुलात, चांदण्यात आणि सुगंधात गुंतवून ठेवली. म्हणूनच अशा माणसापासून व त्याच्या सामाजिक वेदनेपासून कोसो मैल दूर असलेल्या या पांढरपेशी लेखकाच्या पारंपरिक साहित्याला दलित साहित्य नाकारते. दलित वाङ्‌मय केवळ परंपरागत जीवनाचा नकार नाही तर या समाजातील वाङ्‌मय परंपरेविषयीही कमालीची असंतुष्टता आहे.

व्यास-वाल्मिकींनी महाकाव्ये लिहिली असली तरी समाजातील उपेक्षित, शोषित अशा दलितांच्या वेदना त्यांच्या काव्याचा विषय झाल्या नसल्यासंबंधीची तक्रार यामुळेच येते.

पारंपरिक साहित्य हे एकच एक विषय चित्रित करण्यात गुंतले होते. त्याच त्या आचार-विचारांची पुनरुक्ती टाळण्यासाठी दलित साहित्य ही पारंपरिक साहित्यव्यवस्था नाकारते. या नकारात्मक भूमिकेचा परिणाम साहित्याबरोबरच वैचारिक लेखन आणि दलितांची चळवळ किंवा दलित लढा यावरही मोठ्या प्रमाणात झाला. या देशातील दलितांचे जगणे नाकारणाऱ्या प्राचीन संस्कृती आणि ही संस्कृती ग्रंथरूपाने जिवंत ठेवणाऱ्या या पारंपरिक साहित्याला दलित साहित्याने आव्हान दिले. जिने दलितांना माणूस म्हणून जगणेही नाकारले त्या प्राचीन संस्कृतीला दलित साहित्याचा नकार आहे. जिने दलितांना अन्यायाने सतत पायदळी तुडविले त्या परंपरेला दलित साहित्याचा नकार आहे, ज्याने दलितांना कधी आपला विषय बनवले नाही आणि बनवले तेव्हा त्यांचे विकृत चित्रण केले त्या पारंपरिक साहित्याला दलित साहित्याचा नकार आहे. दलित साहित्यिकांना पारंपरिक साहित्यमूल्यांनी आपल्या साहित्याचे खरेखुरे मूल्यमापन होणे अशक्यच वाटत असल्याने पारंपरिक साहित्य मूल्यांनाही दलित साहित्याचा नकार आहे. नकाराचे हे सर्वंकष पाहिले की, दलितांच्या अथांग दुःखाची आणि असंतोषाची थोडीफार कल्पना येते. भारतीय संस्कृतीने आजतागायत दलितांना जी वागणूक दिलेली आहे ती पाहता त्यांना असा नकार द्यावा असे वाटणे अत्यंत स्वाभाविकच आहे. दलित जीवनाचे पारंपरिक साहित्यातील चित्रण पाहिले तर ते विकृत स्वरुपाचे आहे. त्यात दलितांच्या भावनांची अभिव्यक्ती झालीच नाही. त्यांच्या जीवनाचे वास्तव चित्रण आलेच नाही. म्हणून आपल्या साहित्याचेही साहित्यिक मूल्यमापन हे पारंपरिक मूल्यांच्या आधारे होण्यापेक्षा नवीन मूल्यांच्या आधारे झाले पाहिजे अशी दलित साहित्यिकांची भूमिका आहे. म्हणून त्यांनी पारंपरिक मूल्यव्यवस्था नाकारून नवसमाजरचनेसाठी नव्या मानवतावादी, आदर्श आणि समतावादी मूल्यांचा स्वीकार साहित्याच्या मूल्यमापनासाठी केला आहे. वास्तवता हे साहित्यमूल्ये दलितांच्या लढ्याचे आणि जीवनाचेही आदर्श मूल्य आहेत. म्हणून दलित साहित्याने अनिष्ठ आणि समाजव्यवस्थेतील अस्पृश्यांना शोषित ठरवून त्याचे शोषण करणाऱ्या मूल्यांना नाकारून समतेवर आधारलेली आदर्श व समतावादी समाजनिर्मितीसाठी आवश्यक अशी नवीन मूल्यव्यवस्था स्वीकारली. कोणत्याही नकाराच्या भूमिकेला जर स्वीकाराची भूमिका असेल तरच तो नकार अर्थपूर्ण होतो. अन्यथा केवळ नाकारीत जाण्याला काहीच अर्थ राहात नाही. वर्णव्यवस्थेत, जातिव्यवस्थेत माणसाचे अवमूल्यन होते. म्हणून दलित साहित्याने वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था नाकारली तर या साहित्याला 'माणूस महान आहे' हे सूत्र स्वीकारले पाहिजे. आजपर्यंत अस्पृश्याचे माणूस म्हणून असलेले अस्तिवच या व्यवस्थेने नाकारल्यामुळे त्याचा माणूस म्हणून कधी विचार झाला नाही, मग तो जीवनात असो की साहित्यात. त्याची माणूस म्हणून शून्यवत किंमत होती. वर्णव्यवस्थेत त्याचे माणूसपण उद्ध्वस्त करण्यात आले होते म्हणून ही अमानुषता, हे पशुपण, हे अमानवी कृत्य करण्यास प्रवृत्त करणाऱ्या वर्णव्यवस्थेला व जातिव्यवस्थेलाच दलित साहित्याने नाकारले व अस्पृश्यांच्या माणुसकीची स्थापना करण्यासाठी माणुसकी हे आदर्शमूल्य स्वीकारले. अस्पृश्य, दलित माणूस हाच दलित साहित्याचा केंद्रभूत विषय बनविला. या पृथ्वीचा कर्ता-करविता ईश्वर आहे म्हणून माणसाला फारशी किंमत नाही असे समजले जात होते. हिंदू धर्मग्रंथांनी याचे समर्थन केले. माणूस हा नियतीच्या हातातील बाहूले आहे असे समजले जात होते. म्हणून माणसाला फारसे महत्त्व नव्हते. त्यातल्या त्यात दलितांना तर कुठल्याच प्रकारचे हक्क नसल्यामुळे त्यांचे कर्तृत्वच नाकारले गेले होते. माणसाचे असे अवमूल्यन करणारी ही व्यवस्थाच दलित साहित्यने नाकारली आहे आणि म.फुले, शाहू, आंबेडकर आणि आगरकर यांनी मांडलेले 'माणूस श्रेष्ठ आहे' हे सूत्र स्वीकारले आहे. त्याचबरोबर सर्व महापूरुषांचे समतावादी विचार दलित साहित्याने स्वीकारले आहे. मानवतेच्या, समतेच्या यशस्वीतेसाठी जे-जे विघातक त्या सर्व बाबींना दलित साहित्याचा नकार आणि भारतीय परंपरातील आणि साहित्यातील अधिष्ठानी समता असलेले विचार आणि साहित्य यांचा कुटुंबीय म्हणून स्वीकार हा सर्वच नकार स्वीकार जाणीवलक्षी आहे, जातीलक्षी नाही. केवळ आपल्याच जातीतील आदर्श, केवळ जातीचेच लेखक अशी इतरांची संकुचितता साकार करण्यापेक्षा बुद्ध, चार्वाक, फुले, आगरकर, केशवसुत अशी निखळ जीवनलक्षी आदर्श मांडणी दलित साहित्याने

केली. मराठी साहित्यात कोणत्याही प्रवाहाने आजवर ही दृष्टी दाखविली नाही. दलित साहित्यानेच वरील गोष्ट करावी. याचे कारण त्याची समाजाच्या आमुलाग्र परिवर्तनाची प्रतिज्ञा. दलित साहित्याला महापुरुषांच्या समतावादी विचारांची अशी आदर्श दिशा आहे. आजपर्यंतच्या मराठी साहित्याने हे समतावादी तत्त्व दडपून ठेवले होते. परिवर्तनाचा ध्यास घेतलेल्या व जुने नष्ट करू पाहणाऱ्या दलित साहित्यिकांना नव्या मूल्यांची सामर्थ्यदृष्टी आहे. नव्या युगमूल्यांची प्रतिष्ठापणा करून स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही आदर्श मूल्ये समाजमनात रुजविण्याची दृष्टी दलित साहित्यिकांकडे आहे. दलित साहित्य हे हिंदू धर्म, शास्त्र, संस्कृती व त्या संस्कृतीने प्रसवलेल्या साहित्याचा निषेध करते, त्याला नाकारते त्या नकारात माणुसकीची अपेक्षा, समाजपरिवर्तनाची मागणी आणि जीवनावरील प्रेम दिसून येते. ही माणुसकी निर्माण करण्यासाठी, समाजपरिवर्तनासाठी आणि जीवनावरील प्रेम निर्माण करण्यासाठी दलित साहित्यातील नकार डॉ. योगेंद्र मेश्राम यांना अत्यंत अर्थपूर्ण वाटतो. आजवर हिंदू धर्म, शास्त्र आणि संस्कृती यांचा पुरस्कार करणाऱ्या साहित्यानेच दलितांची शोषणव्यवस्था सुरक्षित ठेवली. अशा अमानवी साहित्याबद्दल संताप व्यक्त करताना व हे साहित्य नाकारताना दया पवार लिहितात,

"देव, धर्म आणि देश फडफडणारी ही तुमची बुजगावणी
अक्कल हुशारीने रचलेत सापळे
बोला माणूस चिरडला की नाही?"[५]

प्राचीन काळापासून या व्यवस्थेत चिरडल्या गेलेल्या व पिळल्या गेलेल्या माणसाची उपेक्षा येथील समाज आणि संस्कृतीने तर केलीच पण येथील वाङ्मयानेही केली. दलित जीवनातील अन्याय-अत्याचाराची दखल येथील पांढरपेशी साहित्यिकांनी घेतली नाही, याउलट या देशातील देव येथील विषमताधीष्ठित धर्म आणि वर्णवादी व्यवस्थेचा गौरव त्यांनी केला. त्या साहित्याला दलित साहित्यिक आपले साहित्य म्हणून कसे स्वीकारतील? डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रत्यक्ष कार्याच्या लढ्यातून दलित साहित्यिकांमध्ये ही नकाराची जाणीव अधिक प्रगल्भ होत गेली. म्हणूनच दलित चळवळीचा व दलित लढ्याचा आंबेडकरी विचार हाच दलित साहित्याचाही आदर्श विचार बनला. त्यामुळे ही चळवळ समाजव्यवस्थेतील जी अनिष्ठ, परंपरावादी मूल्ये समाज आणि संस्कृती नाकारते. तसेच दलित साहित्यिकही या सर्व अनिष्ठ बाबी नाकारते. दलित चळवळीने पुराणविचारव्यवस्थेला नकार दिला, पुराणप्रियतेला नकार दिला, अंधश्रध्देला नकार दिला. पवित्र-अपवित्रतेच्या कल्पनांना नकार दिला, भेदवादी साहित्याला नकार दिला नकार ही संकल्पना मानसिकतेशी संबंधित आहे. नकाराबरोबर स्वीकार अपरिहार्य असतो. दलित साहित्याचा स्वीकार मानवी स्वातंत्र्याच्या मूल्यगर्भतेचा आहे. दलित साहित्याचा स्वीकार जीवननिष्ठ आहे. या देशातील धर्माने, वर्णव्यवस्थेने व अमानुष अत्याचार लादणाऱ्या संस्कृतीने माणसाची व त्याच्या माणुसकीच्या मूल्याची पायमल्ली केली होती. इतिहासाने दलितांना दु:ख, दैन्य आणि दारिद्र्याशिवाय काही दिले नाही. त्यांचे भविष्यच खुडून टाकले. त्यांच्या जीवनातील अशा कित्येक गोष्टी त्यांच्या वाट्याला आलेल्या आहेत की त्या नाकारल्याशिवाय त्याचे जीवनच सुखी होऊ शकत नाही. इतिहासाने दलितांना काय दिले आहे? फक्त अंधार आणि अंधार ! त्याला भविष्य नाही. समाजात असे काय आहे की, त्यांनी ते स्वीकारावे. उलट अशा कित्येक गोष्टी त्याच्या वाट्याला आल्या आहेत की, त्या तो नाकारणारच. तो नाकारणार आहे जातिव्यवस्था, वर्णव्यवस्था. तो नाकारणार आहे त्याला बांधून ठेवणारी अस्पृश्यता, तो नाकारणार आहे धर्मसत्ता, धनिकसत्ता, गुलामीत अडकणारी हितसंबंधीयांची सत्ता. तो नाकारणार आहे माणसाला नष्ट करणाऱ्या हिंसक प्रवृत्ती, तो नाकारणार आहे माणसाला पंगू करणाऱ्या अंधश्रध्दा. तो नाकारणार आहे पारंपरिक तटबंदी आणि जुन्या जळमटलेल्या विद्या. तो नाकारणार आहे अत्याचार, दडपशाही, वशिलेबाजी आणि स्वार्थी संधिसाधूपणा. तो नाकारणार आहे मराठी वाङ्मयातील बुरसट परंपरा. तो नाकारणार आहे हिंदू धर्मातील पुराणकथा आणि कोता कर्मठपणा. तो नाकारणार आहे दैन्य आणि दास्य. तो नाकारणार आहे सरंजामशाही आणि पुरोहितशाही. ज्या जातिव्यवस्थेने आणि वर्णव्यवस्थेने

दलितांना अस्पृश्यतेत बंदिस्त करून ठेवले, काही विशिष्ट लोकांनी आपल्या स्वार्थासाठी धर्मसत्ता आणि धनिकसत्ता स्वत:कडेच ठेवली, त्यामुळे दलितांच्या अनेक पिढ्या या पारंपरिक गुलामगिरीत नष्ट झाल्या. म्हणूनच आपल्या वंशजाच्या अनेक पिढ्यांना ज्यांनी अतोनात छळले त्यांच्या धर्म, वर्ण आणि जाती या सर्व शोषण व्यवस्थांना दलित साहित्यिक नाकारतात.

दलितांच्या वाट्याला या परंपरेने दु:ख, छळ, अपमान, मरणप्राय यातना आणि सर्वांगीण स्वरुपाचे शोषण लादले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी प्रेरित झालेल्या साहित्यिकांना दलित शोषणाची ही पार्श्वभूमी व्यक्त करणे आवश्यक वाटले, कारण त्याशिवाय या नकारामागची भूमिका लक्षात येणार नाही. परंपरेने लादलेल्या या गुलामगिरीबद्दल लिहिताना डॉ. प्रल्हाद लुलेकर म्हणतात, "मानवनिर्मित परंपरेने लादलेली गुलामगिरी, शोषण यांना नाकारण्याची आत्यंतिक गरज दलित साहित्यातून अभिव्यक्त झाली. आत्मसन्मानाच्या आड जे जे येईल त्याला नकार देण्याची भूमिका दलित साहित्याने घेतली. समाजातील अस्तित्वात असलेली प्रस्थापित व्यवस्था अमान्य करणे हे ध्येय कोणत्याही विद्रोह चळवळीचे असते."[६] विद्रोही चळवळीचा जणू स्थायीभावच हा नकार आहे. दलित साहित्याची चळवळ-विद्रोही चळवळ आहे आणि या चळवळीने दलितांच्या आत्मसन्मानाच्या व विकासाच्या आड येणाऱ्या परंपराना नकार दिला. जुन्या जळमटलेल्या विद्या, अत्याचार, दडपशाही, वशिलेबाजी, स्वार्थ, संधिसाधूपणा, पुराणकथा, कर्मठपणा, दैन्य आणि दास्य या सर्व बाबींना दलित साहित्याने नकार दिला. या नकाराचे स्वरूप व्यक्त करताना शरणकुमार लिंबाळे म्हणतात, "ज्या प्रस्थापित विषमव्यवस्थेने दलितांचे शोषण केले त्या व्यवस्थेला दिलेला हा नकार आहे. ह्या नकाराचे स्वरूप दुधारी आहे. विषमव्यवस्थेला नकार देत असताना समता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुंतेची मागणी करणारा हा विचार आहे. त्यामुळे दलित साहित्यातील नकार हा विधायक दृष्टी असलेला प्रतिकार आहे."[७] दलित साहित्यिकांची एक निश्चित स्वरूपाची भूमिका आहे त्यांना जुने पारंपरिक, अनिष्ठ नष्ट करून आदर्श आणि समतावादी मूल्यांची निर्मिती करावयाची आहे म्हणून नकाराची भूमिका दलित साहित्याने जाणीवपूर्वक स्वीकारली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'हु वेअर दि शुद्राज' आणि 'दि अनटचेबल्स' या ग्रंथातून सबंध दलितांना या देशातील इतिहासाकडे वेगळ्या दृष्टीने पाहण्याची दिशा दिली. त्यातूनच विद्रोही साहित्य उदयास आले. कोणत्याही देशाच्या इतिहासात त्या देशाच्या भूतकाळातील सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय आणि नैतिक व्यवहारांचे व भूतकाळातील घटनांचे प्रतिबिंब उमटलेले असते. म्हणूनच कोणत्याही समूहाचा अन्याय, उत्कर्ष, प्रगती, अधोगती, शोषण, दडपशाही आणि आपली प्रतिमा, मूल्यात्मकता यांचा त्यातून शोध घेता येतो. वाङ्मयीन व्यवहारासाठी एक प्रेरणादायी विचार म्हणून दलित साहित्य निर्मितीत त्याचा स्पष्टपणे आढळ होतो. दलित साहित्यिकांनी या देशातील इतिहासाचा नव्या विज्ञाननिष्ठ व मानवतावादी दृष्टीने शोध घेतला. नव्या दृष्टीने इतिहासाकडे पाहण्याच्या दृष्टीमुळेच दलित लेखक इतिहासाचा अन्वयार्थ लावू लागले आणि त्यातील सत्य, दलितांची अपमानास्पदता पाहून इतिहासातील सर्व शोषणस्थळे त्यांनी नाकारली. इतिहासाच्या अन्वय आणि अन्वयार्थातून लाभलेल्या या दृष्टीतूनच दलित लेखक पुराण धर्मग्रंथ आणि त्या धर्मग्रंथातून निर्माण होणारी पुराण मानसिकता नाकारतो, ब्राह्मणी धर्म नाकारतो आणि सवत:विषयीच्या विकृत केलेल्या प्रतिमाही नाकारतो, संत वाङ्मयातील ईश्वरीय अधिसत्ता व कर्मविपाकही नाकारतो आणि या ग्रंथातून प्रस्फुरित होणारे मूलतत्त्ववादी तत्त्वज्ञानही नाकारतो. इतिहासात आपले स्थान शोधून अपमानास्पद इतिहासापेक्षा नवीन स्वाभिमानाचा, स्वावलंबनाचा, मानवतेचा आणि स्वातंत्र्य, समता व बंधुतेचा नवा इतिहास दलित साहित्यिकांना घडवायचा आहे. संतांनी समाजप्रबोधन केले. वाङ्मयाच्या माध्यमातून आध्यात्मिक लोकशाही समाजात रुजविण्याचा प्रयत्न केला; परंतु त्यांच्याही वाङ्मयात ईश्वरी अधिसत्ता आणि कर्मविपाक परंपरा जाणवते. या सर्व बाबींना दलित साहित्याने नाकारले आणि आपल्या उज्ज्वल आयुष्यासाठी समता प्रस्थापित करण्यासाठी लोकशाही मूल्य वृद्धिंगत करण्यासाठी दलित साहित्यिक नवविचार, पुरोगामी तत्त्व आणि विज्ञाननिष्ठ विचार स्वीकारतात. या देशाच्या संस्कृतीतील धर्म,

देव, दैव आणि पोथीनिष्ठा यांना नाकारून अत्यंत डोळस आणि बुद्धिप्रामाण्यवादी विचार दलित साहित्यिकांनी स्वीकारला आहे. आंबेडकर विचार पोथीनिष्ठा नाकारतो आणि बुद्धि प्रामाण्य स्वीकारतो. आंबेडकर विचार विभूतीपूजा नाकारतो आणि विज्ञाननिष्ठा स्वीकारतो. आंबेडकर विचार देव, दैव नाकारतो आणि दास्यमुक्तता स्वीकारतो." येथील पोथीनिष्ठ विचार माणसाच्या व्यक्तिस्वातंत्र्यावर नियंत्रण ठेवतो तर देव आणि दैव या अनिष्ठ प्रथा माणसाला अंधश्रद्ध, आळशी बनवून त्यांना कर्तव्यापासून दूर नेतात. आजपर्यंतच्या साहित्यातूनही प्रामुख्याने वर्णव्यवस्थेचे व शोषणव्यवस्थेचे समर्थन करण्यात आले होते. एकीकडे माणसासारख्या माणसांचा अस्तित्वहीन समजून पशु-प्राण्यांपेक्षा वाईट छळ केला जात होता, तर दुसरीकडे अस्तित्वात नसलेल्या अनेक काल्पनिक बाबी स्वतःच्या स्वार्थासाठी दलित समाजापुढे आदर्श म्हणून ठेवण्यात आल्या होत्या. जणू दलितांच्या जगण्याची हत्याच या व्यवस्थेने केली होती. साहित्यातूनही हाच पोथीनिष्ठ, देववादी, दैववादी आणि विषमतावादी विचार व्यक्त झाला आहे. म्हणूनच दलितांचे स्वतंत्र साहित्य, साहित्यसंस्था आणि साहित्य संमेलनाचे व्यासपीठ निर्माण झाले आहे. ही साहित्यसंस्था व साहित्याचे व्यासपीठ केवळ मराठी साहित्य संमेलनाला नाकारण्याच्या भूमिकेतून निर्माण झाले नाही तर एकूण मराठी वाङ्मय व त्याची परंपरा नाकारण्याच्या भूमिकेतून निर्माण झाले आहे. साहित्य या सामाजिक संस्थेलाच याद्वारे आव्हान देण्यात आले आहे, असे यावरून दिसते. आजपर्यंतच्या साहित्यातून आपली उपेक्षा झाली आहे. आपल्यावरील अन्याय, अत्याचाराची दखलच साहित्यातून कोणी घेतली नाही. या जाणिवेतून दलित साहित्याची वेगळी चूल दलित साहित्यिकांनी मांडली आहे. आजपर्यंतच्या आपल्या समाजावरील अन्याय, अत्याचाराची प्रतिक्रिया आणि समतावादी, मानवतावादी, नवसमाजरचना निर्माण करण्याच्या विधायक कार्याची अथवा सामाजिक क्रांतीची प्रेरणा असे दोन्हीही घटक या वेगळेपण सिध्द करणाऱ्या दलित साहित्याच्या निर्मितीला कारणीभूत ठरले ओहत.

दलित साहित्यातील विद्रोह आणि नकार समाजव्यवस्थेतील सर्वांगीण दृष्टीने शुध्द व मानवी मूल्ये घेऊन व्यक्त होतो.जुन्याचा त्याग करून नवी मूल्यव्यवस्था निर्माण करण्यासाठी विद्रोहाची अभिव्यक्ती करणे हे दलित साहित्याचे एक महत्त्वपूर्ण कार्य होय, प्रचलित समाजरचनेला व परंपरेला नाकारणे, ती बदलण्यासाठी विद्रोह करणे आणि आपल्या आकांक्षेनुसार नव्या समाजरचनेसंबंधी मत प्रकट करणे आणि म्हणजे थोडक्यात सांगावयाचे तर नकार, विद्रोह आणि आकांक्षा असे विविध भाव या जनजागृत व्यक्तीच्या मुखातून प्रकट होत आहेत. दलित साहित्य या तीन भावाविष्कारांनी युक्त आहे. आणि या तीन मूल्यांतूनच नवसमाजरचना निर्माण करून दलितांना न्याय मिळवून देणे येथील हजारो वर्षांपासूनचे अज्ञान, रूढी, परंपरा, जातिभेद, पुराणप्रियता आणि पोथीनिष्ठा इ. अनिष्ठ बाबी धुळीस मिळविणे हे या दलित साहित्यातील मूल्यत्रयींचे उद्दिष्ट आहे, असे म्हणता येईल. दलित साहित्यातील 'नकार' आणि 'विद्रोह' दलितांच्या हजारो वर्षांपासूनच्या चिरवेदनेतून उदयास आला. असे शरणकुमार लिंबाळे यांना वाटते ते लिहितात, "दलित साहित्यातील 'नकार' आणि 'विद्रोह' हा दलितांच्या वेदनेतून जन्मला आहे. हा नकार, हा विद्रोह आपल्यावर लादलेल्या अमानवी व्यवस्थेविरूध्द आहे."[८] दलित साहित्यातील विद्रोह व नकार वेदनेतून व दुःखातून उदयाला आलेला असल्यामुळे तो आव्हानात्मक आहे.म्हणून आदर्श मूल्ये घेऊन तो साहित्याच्या प्रांतात मूल्यवान कार्य करीत आहे.

**निष्कर्ष :-**

१. दलित साहित्य हे डॉ. बाबासाहेबांच्या प्रेरणेतून उदयाला आले आहे.
२. वेदना व विद्रोहाबरोबरच नकार हे दलित साहित्याचे महत्त्वाचे मुद्दे आहेत.
३. येथील विषमताधिष्ठित समाजव्यवस्था, धर्म आणि धर्मग्रंथ दलित साहित्याने नाकारले आहेत.
४. दलित माणसांच्या जीवनापासून दूर असलेले पारंपरिक साहित्य दलित लेखकाने नाकारले आहेत.
५. विषमताधिष्ठित जुनी मूल्ये नाकारून नवी समतावादी मूल्ये दलित साहित्यिकांनी स्वीकारली आहेत.

**संदर्भ सूची:**

१. प्रभाकर मांडे, 'दलित साहित्याचे निराळेपण', गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, तिसरी आवृत्ती १९९५, पृष्ठ ७७.
२. बी. रंगराव, 'नव्या वाटा नवी वळणे' (वाङ्मयीन समीक्षा), सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९८९, पृष्ठ २.
३. डॉ. सदा कऱ्हाडे, 'दलित साहित्यचिकित्सा', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, २००१, पृष्ठ ४८.
४. भालचंद्र फडके, 'दलित साहित्य : वेदना आणि विद्रोह', श्रीविद्या प्रकाशन, पुणे, तिसरी आवृत्ती २०००, पृष्ठ १४५.
५. डॉ. यशवंत मनोहर, 'साहित्य : बांधीलकी आणि विद्रोह', आनंद प्रकाशन, औरंगाबाद, पृष्ठ ९२.
६. डॉ. प्रल्हाद लुलेकर, 'वेदनांचा प्रदेश' (मराठवाड्यातील दलित आत्मकथने), कैलास पब्लिकेशन्स,औरंगाबाद, प्रथमावृत्ती २०००, पृष्ठ ६०.
७. शरणकुमार लिंबाळे, 'दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र', दिलीपराज प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती २००४, पृष्ठ २०.
८. (संपा.) शरणकुमार लिंबाळे, 'शतकातील दलित विचार', दिलीपराज प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २००१, पृष्ठ ३४.

Aayushi International Interdisciplinary Research Journal ISSN 2349-638X www aiirjournal.com